## निशाणी क्र. १४ वरील आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज वादीच्या वारसानांना दाव्यात वादी म्हणून समाविष्ट करण्यास झालेल्या उशिराची माफी मागण्याकरीता केलेला आहे.

२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे दाव्यातील मुळ वादी गणेश फुलचंद आकोडे हे दि. १९.०७.२०१९ रोजी मरण पावले. अर्जदार हे मयत वादीचे वारस आहेत. त्यांना दाव्यात वादीचे वारस म्हणून समाविष्ट करणे गरजेचे होते. परंतु अर्जदाराला कायद्याचे ज्ञान नसुन न्यायालयात दावा प्रलंबित असल्याबाबत तिला माहीत नव्हते. डिसेंबर २०१९ च्या शेवटच्या आठवडयात तिने तिच्या मुलाचे आधार कार्ड अद्यावत करण्याकरीता जन्म दाखल्याचा शोध घेत असतांना अर्जदारास वादपत्र व दाव्या संबंधीत दस्ताऐवज प्राप्त झाले व त्यानंतर तिने वकीलांशी संपर्क केले. त्यामुळे अर्जदारास मय्यत वादीच्या वारसानांना दाव्यात समाविष्ट करण्यास उशिर झाला. त्यामुळे झालेल्या उशिराची माफी मिळण्यात यावी अशी अर्जदाराने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अर्जदाराच्या अर्जास नि. क्र. १७ अन्वये प्रखर विरोध नोंदविला. त्यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत अर्जात केलेले कथन हे खोटे व बनावटी आहे. अर्जदारास दाव्याचे कारण माहीत नसल्यामुळे त्यांना वादीचे वारस म्हणून दाव्यात समाविष्ट करता येणार नाही. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिला दाव्याबाबतची माहीती डिसेंबर २०१९ च्या शेवटच्या आठवडयात झाली असून तिने लगेचच वारस दाव्यात समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही केली नाही. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेल्या उशिराचे योग्य कारण दिले नसल्याने सदरचा अर्ज विधीग्राहय नाही व त्यामुळे अर्ज खारिज करण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

४. अर्जदारातर्फे ॲड. पराडकर यांनी युक्तीवाद केला. प्रतिवादी तर्फे ॲड.

टोपले यांनी युक्तीवाद केला.

५. दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी गणेश फुलचंद आकोडे यांनी प्रस्तुतचा दावा हे प्रतिवादी विरुध्द घोषणा, ताबा व अनिवार्य तसेच कायमच्या मनाई हुकुमाकरीता केलेला आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राप्रमाणे वादीचे निधन दि. १९.०७.२०१९ रोजी झाले. प्रतिवादीने त्यांचे लेखी बयाण दाखल केल्या नंतर प्रस्तुतचे प्रकरण हे वादमुद्दे निश्चीत करण्याकरीता ठेवण्यात आले होते. परंतु दरम्यान वादीचे निधन झाले असल्याचे दिसुन येते. तद्नंतर प्रस्तुत अर्जदाराने दि. २२.०१.२०२० रोजी वादीचे वारस अभिलेखावर आणण्याकरीताची तसेच वारस अभिलेखावर आणण्याकरीता झालेल्या उशिराची माफी मिळण्याबाबतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज हे अर्जदाराच्या शपथपत्रावर दाखल केले आहे. तिने शपथपत्रावर सांगितले आहे की, तिला कायद्याबाबत व प्रस्तुत प्रकरणाबाबत माहीती नव्हती. डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयात तिला प्रस्तुत प्रकरणाबाबतचे दस्ताऐवज प्राप्त झाल्याने दाव्याबाबतची माहीती झाली व त्यानंतर तिने विधीज्ञांशी संपर्क साधुन योग्य ती कार्यवाही केली. अर्जदाराने उपरोक्त कथन हे तिच्या शपथपत्रावर केले असल्याने त्यावर अविश्वास दाखविण्यासारखे काही नाही. वादी यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे व तिच्या पतीच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस अभिलेखावर घ्यावे लागतात याबाबत अर्जदारास व तिच्या मुलास ज्ञान नसल्याचे अर्जदाराच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला. यावरुन अर्जदाराने जाणुनबुजुन मयत वादीच्या वारसानांना अभिलेखावर घेण्यास हयगय केली असे दिसुन येत नाही. वादीच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसानांना अभिलेखावर घेण्यास झालेल्या उशिराची माफी न दिल्यास अर्जदाराचे अतोनात नुकसान होईल. याउलट प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादींना भरपाई करता येईल. अशा परिस्थीतीत दावा गुणवत्तेवर निकाली

काढण्याकरीता अर्जदारास संधी देणे न्याय हिताचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. नि. क्र. १४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत वादीच्या वारसानांना दाव्यात समाविष्ट करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. अर्जदाराने प्रतिवादींना रुपये ३००/– दंड (costs) द्यावा.

Manjusha Manikrao Alone — Digitally signed by Manjusha Manikrao Alone Date: 2020.10.15 13:33:28 +0530

(कु. एम. एम. अलोणे)

ठिकाणः कारंजा घा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,

दि. १३.१०.२०२० कारंजा घा.